# प्रमाणपत्र पडताळणीसाठी उमेदवारांकरीता महत्त्वाच्या सुचना

१) प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रीयेकरीता उमेदवारांना व्यक्तिश: स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. कोणत्याही कारणास्तव उमेदवारा व्यतिरिक्त अन्य व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही.

२) प्रमाणपत्र पडताळणीअंती उमेदवार संबंधीत पदासाठी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीकरीता त्यांचा विचार केला जाणार नाही.

३) ज्या पदासाठी दिव्यांग प्रवर्गातील रिक्त पदे जाहिर करण्यात आलेली आहेत. त्या पदाकरिता प्रमाणपत्र पडताळणीकरिता बोलावण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी नमुद केलेल्या दिवशी, वेळी व नमुद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे. दिव्यांग उमेदवारांच्या दिव्यांग प्रमाणपत्राबाबत नियमावली माहिती पुस्तिकेत Annexure “E” मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानूसार दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) वाहनचालक या पदासाठी प्रमाणपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची वाहन चालविण्याची चाचणी घेण्यात येणार आहे. सदर चाचणीचा दिनांक, वेळ व ठिकाण संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहिर होईल. त्या चाचणीसाठी संबंधीत उमेदवार उपस्थित राहिला नाही तर उमेदवार अपात्र ठरेल. त्यांना पुन्हा सदर चाचणीची संधी दिली जाणार नाही.

५) कागदपत्र पडताळणीकरीता सर्व पदनामांसाठी राज्य गुणवत्ता क्रमांकानुसार उमेदवारांना बोलविण्यात आलेले आहे. बोलविण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार ज्या संबंधित राखीव प्रवर्गासाठी पात्र आहेत त्यांनीच पडताळणीसाठी यावे. राज्य गुणवत्ता क्रमांकानुसार बोलविण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार ज्या संबंधित राखीव पदासाठी पात्र नसल्यास त्यांनी प्रमाणपत्र पडताळणीसाठी हजर राहू नये.

उदा. एखाद्या पदाकरीताच्या अ.जा. (S.C.) या प्रवर्गासाठी राज्य गुणवत्ता क्र. ०१ ते २१५८ (CML/Sr. Number- ०१ ते २१५८) पर्यंतच्या उमेदवारांना बोलावण्यात आलेले आहे. राज्य गुणवत्ता क्र. ०१ ते २१५८ मधील फक्त अ.जा. या प्रवर्गातील उमेदवारांनीच उपस्थित रहावे, जे उमेदवार अ.जा. (S.C.) या प्रवर्गाचे नाहीत, त्यांनी कृपया सदर पडताळणी प्रकियेस हजर राहू नये. हेच उदाहरण इतर सर्व पदांना लागू राहील.

६) ज्या उमेदवारांनी दोन वेगवेगळया पदांसाठी अर्ज केलेले आहेत त्यांनी अर्ज केलेल्या दोन्हीही पदाकरीताच्या कागदपत्र पडताळणीसाठी स्वतंत्रपणे उपस्थित रहावे.

७) पडताळणीकरीता केंद्रावर उपस्थित झाल्यानंतर उमेदवारांनी मोबाईल switch off करावा. जर मोबाईल चालू करुन बोलताना, रेकॉर्डिंग करताना किंवा इतर कोणत्याही Electronic साधनांद्वारे Video Shooting करताना आढळल्यास उमेदवाराचा मोबाईल / ई-साधन जप्त करण्यात येईल व अशा उमेदवारांना पडताळणी प्रक्रियेतून बाद करुन केंद्राच्या बाहेर काढण्यात येईल याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

८) शासन नियमानुसार उमेदवारांना विहित कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी बोलवण्यात आले आहे. प्रमाणपत्र पडताळणी करिता बोलविण्यात आले याचा अर्थ सर्व उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड निश्चित झाली आहे असे समजण्यात येऊ नये. सदर पडताळणीअंती गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

९) उपरोक्त मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेमध्ये कोणतीही शंका अथवा निर्माण झाल्यास त्यावेळी तेथील पडताळणी समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणत्याही उमेदवारास निवेदन सादर करावयाचे असल्यास त्याने सदरचे निवेदन मा.आयुक्त, वैद्यकिय शिक्षण व आयुष, शासकिय दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, छ.शि.म.ट.जवळ, मुंबई – ४०० ००१ यांच्या कार्यालयात सादर करावे. अशा प्राप्त निवेदनावरील मा.आयुक्त, वैद्यकिय शिक्षण व आयुष यांचा निर्णय निवेदनकर्त्यास बंधनकारक राहील.

आयुक्त,
वैद्यकिय शिक्षण व आयुष